**फिर्याद**

नाशिकरोड पो.स्टे.नाशिक शहर
दि.१३/०१/२०२२

माझे नाव आंबादास गिरीजाप्रसाद जाधव वय ३२ धंदा— संगणक परीचालक ग्रामपंचायत चांदगिरी, ता.जि.नाशिक रा.मु.पो. शिंदे, खंडेराव नगर, ता.जि.नाशिक मो.नं. ७३८५७२९०३९

मी समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील नमुद ठिकाणी पत्नी व दोन मुलांसह एकत्रित कुटुबी राहतो. व संगणक परीचालक ग्रामपंचायत चांदगिरी येथे खाजगी नोकरी करतो.

मी दि.३०/११/२०२१ रोजी राहत्या घराच्या विजपुरवठा मीटर जोडणी मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केलेला आहे. सदर अर्जानुसार विज कनेक्शन मंजूर झाल्याबाबतचा मेसेज मला दि.०९/१२/२०२१ रोजी मोबाईलवर आलेला आहे. महावितरण विभागाच्या नियमानुसार दि.१६/१२/२०२१ रोजी १,२४८/—रूपये (अक्षरी एक हजार दोनशे अठठेचाळीस रू. फक्त) कोटेशनची भरणा करून पावती घेतली. त्यानुसार महावितरण शिंदे उपकेंद्रात पुर्तता करण्यासाठी विद्युत कनेक्शन कोटेशनची पावती व कोटेशन जोडून सादर केले.

त्यांनतर दिनांक ०७/१/२०२२ रोजी पुन्हा महावितरण उपकेंद्र, शिंदेगाव येथे जाऊन श्री.राहुल पवार यांची भेट घेतली. तेव्हा श्री.पवार यांनी मला सांगीतले की, तुला जर विज कनेक्शन पाहीजे असेल तर आम्हाला एक हजार पाचशे रूपये (१५००/—) दयावे लागतील त्याशिवाय साहेब जोडणी देणार नाहीत.

तरी मी विज कनेक्शनसाठी शासकीय रक्कमेचा भरणा केलेला असून त्याव्यतिरीक्त महावितरणच्या अधिकाऱ्यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने. श्री.राहुल पवार यांचेवर लाचेची कारवाई होण्यासाठी दि.११/१/२०२२ रोजी ला.प्र.वि.नाशिक कार्यालयात समक्ष लेखी तक्रार दिली. त्यावर मी तसेच दोन्ही पंचानीसहया केल्या नंतर समक्ष म्हणुन श्रीमती.पाटील मॅडमांनी सही केली.

मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.१२/०१/२०२२ पो.उप अधीक्षक श्रीमती.पाटील यांनी महावितरण शिंदे उपकेंद्र कार्यालयातील खाजगी इसम श्री.पवार हे माझेकडे खरोखर पैसे मागतात अगर कसे? याची खात्री करणेसाठी माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून शर्टाचे खिशात ठेवले व सोबत पंच श्री.खैरनार यांना देवुन मला श्री.पवार यांचे भेटीसाठी नाशिक पुणे महामार्गावरील आप्पा ढाबाजवळुन दुपारी १२.०६ वा.सुमारास मी आणलेल्या दुचाकीवर पाठवुन दिले. त्या प्रमाणे मी माझी बजाज डिस्कव्हर मो.सा.क्र.एमएच १५ ईक्यु ८४०५ वर बसुन पंच श्री.खैरनार यांचेसह महावितरण शिंदे उपकेंद्र गेलो तेथे मला श्री.राहुल पवार भेटले असता त्यांनी विजमिटर जोडणी मिळवुन देण्यासाठी माझेकडे १५००रू.लाचेची मागणी केली. श्री.पवार यांनी केलेली पैशांची मागणी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाली असुन ती पो.उप अधीक्षक श्रीमती.पाटील मॅडमांनी व पंचानी ऐकुन खात्री केली व व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले मेमरीकार्ड काढुन ताब्यात घेतले.

त्यानंतर दि.१३/१/२०२२ रोजी मी हजर केलेल्या लाचेची रक्कम १५००/— रूपयास अंथ्रासीन पावडर लावुन त्यानोटा माझे शर्टाचे खिशात ठेवुन दिली. व तेथुन आपण सर्व नाशिक पुणे महामार्ग चिंचोली फाटयाजवळ गेल्यावर माझेजवळ पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टच्या आतील बनियानला पिनच्या सहायाने पाउच लावुन पाउचमध्ये ठेवुन दिले. व पंच १ श्री.खैरनार यांना सोबत देवुन १२.४० रवाना केले. मी व पंच नं.१ खैरनार दुचाकीने महावितरण शिंदे उपकेंद्र येथे जावुन श्री.पवार यांची भेट घेतली. तोपर्यंत आमचे मागोमाग पोलीसउप अधीक्षक श्रीमती.पाटील व त्यांचे सापळा पथक पंच नं.२ श्री.शिंदे असे आमचे मागोमाग आले. मी केलेल्यां इशाऱ्यावरून श्रीमती.पाटील मॅडम व त्यांचे सापळा पथकाने श्री.पवार यांना दुपारी १३.०० वाजेचे सुमारास रंगेहाथ पकडुन त्यांना आपली ओळख देवुन त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.राहुल ज्ञानेश्वर पवार, वय—३१, रा.एन—५२/केए—१/२२/१०, सिंहस्थ नगर, सिडको, नाशिक असे सांगितले. आपण त्यांचे फोटो घेवुन त्यांचेकडुन लाचेची रक्कम घेवुन श्री.राहुल पवार यांना ला.प्र.वि.नाशिक कार्यालयात आणुन त्यांचेविरूध्द माझे तक्रारीवरुन लाचेची कारवाई केली आहे.

तरी आज दि.१३/०१/२०२२ रोजी दुपारी १३.०० वा.महावितरण शिंदे उपकेंद्रातील खाजगी इसम आरोपी राहुल ज्ञानेश्वर पवार, वय ३१, रा.एन—५२/केए—१/२२/१०, सिंहस्थ नगर, सिडको, नाशिक यांनी माझे विज जोडणी मिळण्याचे ऑनलाईन् अर्जानुसार शासकिय रकमेचे कोटेशन रक्कम भरलेले असतानाही विज मिटर जोडणी मिळवुन देण्यासाठी माझेकडुन १५००/—रू. लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना सापळा पथकाने पकडले म्हणुन माझी राहुल ज्ञानेश्वर पवार, यांचे विरूध्द लेखी फिर्याद आहे.

माझी वरील टंकलिखीत केलली फिर्याद मी वाचुन पाहिली ती मी सांगीतले प्रमाणे बरोबर लिहीली आहे.

समक्ष

ही फिर्याद लिहून दिली
दि.१३/०१/२०२२

पोलीस ठाणे अंमलदार
नाशिकरोड पोलीस स्टेशन
नाशिक शहर

श्री. आंबादास गिरिजाप्रसाद जाधव

Scanned with CamScanner